खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२४ – २५

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरण – कार्यशाळा

पुण्य नगरी

# राजगुरू महाविद्यालयात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणासंदर्भात शुक्रवारी जागृती अभियान

**शिरोली** : खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचालित हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० संदर्भात स्कूल कनेक्ट हे संपर्क अभियान राबविण्यात येणार असून त्या अंतर्गत पदवीच्या प्रथम वर्षाला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थी व त्यांच्या पालकांसाठी जागृती अभियानाचे आयोजन शुक्रवारी (दि. २८) सकाळी १० वाजता करण्यात आल्याची माहिती संस्थाध्यक्ष ॲड देवेंद्र बुट्टेपाटील यांनी दिली. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार स्कूल कनेक्ट या कार्यक्रमांतर्गत पुण्याच्या नेस वाडीया महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. प्रकाश चौधरी हे विद्यार्थी आणि पालकांना मार्गदर्शन करणार आहेत. या अभियानातून विद्यार्थी आणि पालकांना राष्ट्रीय शैक्षणिक धोरणासंदर्भात जागरूक करून त्यांच्या शंकाचे निरसण करण्यात येणार आहे. विद्यार्थी व पालकांनी या अभियानास उपस्थित राहून शैक्षणिक धोरण समजून घेण्याचे आवाहन प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी केले आहे.

Pimpri Chinchwad Edition
Jun 27, 2024 Page No. 03
Powered by: erelego.com

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# राजगुरू महाविद्यालयात शैक्षणिक धोरणावर चर्चा

**राजगुरुनगर : पुढारी वृत्तसेवा**

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचालित हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण संदर्भात स्कूल कनेक्ट हे संपर्क अभियान राबविण्यात येणार आहे. त्या अंतर्गत प्रथम वर्षाला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थी व त्यांच्या पालकांसाठी मार्गदर्शन शिबिराचे आयोजन शुक्रवारी (दि. २८) सकाळी १० वाजता करण्यात आल्याची माहिती संस्थाध्यक्ष देवेंद्र बुट्टे पाटील यांनी दिली.

पुण्याच्या नेस वाडिया महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रो. डॉ. प्रकाश चौधरी हे विद्यार्थी आणि पालकांना मार्गदर्शन करणार आहेत. विद्यार्थी व पालकांनी या अभियानास उपस्थित राहावे, असे आवाहन प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी केले आहे.

My Gramin Edition
Jun 26, 2024 Page No. 07
Powered by: erelego.com

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# शैक्षणिक धोरणातून ज्ञानाला कृतीची जोड : डॉ. चौधरी

**राजगुरुनगर : पुढारी वृत्तसेवा**

कौशल्याभिमुख शिक्षणाला प्राधान्य देणारी शिक्षणव्यवस्था असलेले राष्ट्रीय शैक्षणिक धोरण खऱ्या अर्थाने ज्ञानाला कृतीची जोड देणारे असल्याचे प्रतिपादन नेस वाडिया महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. प्रकाश चौधरी यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित स्कूल कनेक्ट संपर्क अभियानांतर्गत आयोजित कार्यशाळेत ते बोलत होते. या प्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, वाडिया महाविद्यालयातील गणित विभागप्रमुख डॉ. रामदास सोनवणे, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, एसबीएमचे प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, समन्वयक डॉ. दिलीप मुळूक, डॉ. गणेश धुमाळ, विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

डॉ. चौधरी म्हणाले, शाश्वत व सर्वसमावेशक विकासाचा अंतर्भाव समाजात होण्यासाठी या शैक्षणिक धोरणाची रचना केली आहे. यातून राष्ट्रीय विकासाला चालना मिळणार आहे. मातृभाषेतून शिक्षणासह भारतीय परंपरा आणि मूल्ये यावर यात भर देण्यात आला आहे. डॉ. सोनवणे यांनी व्यवसाय व नोकरीसाठी शैक्षणिक धोरण उपयुक्त ठरणार असल्याचे सांगितले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. पिंगळे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. मुळूक यांनी केले.




हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात पालक प्रतिनिधींना सन्मानित करताना मान्यवर.

My Gramin Edition
Jul 1, 2024 Page No. 06
Powered by: erelego.com

# ज्ञानाला कृतीची जोड देणारे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - डॉ. प्रकाश चौधरी



**राजगुरूनगर :** कौशल्याभिमुख शिक्षणाला प्राधान्य देणारी शिक्षणव्यवस्था असलेले राष्ट्रीय शैक्षणिक धोरण खऱ्या अर्थाने ज्ञानाला कृतीची जोड देणारे असल्याचे प्रतिपादन नेस वाडीया महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. प्रकाश चौधरी यांनी केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'स्कूल कनेक्ट' संपर्क अभियानांतर्गत एकदिवसीय जनजागृती कार्यशाळेत बोलत होते. याप्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, वाडिया महाविद्यालयातील गणित विभागप्रमुख डॉ. रामदास सोनवणे, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, एसबीएमचे प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, समन्वयक डॉ. दिलीप मुळूक आणि पदवीच्या प्रथम वर्षाला प्रवेश घेतलेले विद्यार्थी व पालक उपस्थित होते. डॉ. प्रकाश चौधरी म्हणाले की, शाश्वत व सर्वसमावेशक विकासाचा अंतर्भाव समाजात होण्यासाठी या शैक्षणिक धोरणाची रचना केली आहे. यातून राष्ट्रीय विकासाला चालना मिळणार आहे. तसेच यामध्ये मातृभाषेतून शिक्षणासह भारतीय परंपरा आणि मूल्ये यावर भर देण्यात आल्याचे सांगितले.

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
01 Jul 2024 - Page 3

# ज्ञानाला कृतीची जोड देणारे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण : डॉ. प्रकाश चौधरी

**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

कौशल्याभिमुख शिक्षणाला प्राधान्य देणारी शिक्षणव्यवस्था असलेले राष्ट्रीय शैक्षणिक धोरण खऱ्या अर्थाने ज्ञानाला कृतीची जोड देणारे असल्याचे प्रतिपादन नेस वाडीया महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. प्रकाश चौधरी यांनी केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित स्कूल कनेक्ट संपर्क अभियानांतर्गत एकदिवसीय जनजागृती कार्यशाळेत बोलत होते.

या प्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, वाडिया महाविद्यालयातील गणित विभागप्रमुख डॉ. रामदास सोनवणे, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, एसबीएमचे प्राचार्य डॉ. एच.एम.जरे, उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, समन्वयक डॉ. दिलीप



मुळूक आणि पदवीच्या प्रथम वर्षाला प्रवेश घेतलेले विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

डॉ. प्रकाश चौधरी म्हणाले की, शाश्वत व सर्वसमावेशक विकासाचा अंतर्भाव समाजात होण्यासाठी या शैक्षणिक धोरणाची रचना केली आहे. यातून राष्ट्रीय विकासाला चालना मिळणार आहे. तसेच यामध्ये मातृभाषेतून शिक्षणासह भारतीय परंपरा आणि मूल्ये यावर भर देण्यात आल्याचे सांगितले.

डॉ. रामदास सोनवणे यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात प्रात्यक्षिक शिक्षणाला महत्त्व असल्याचे सांगून व्यवसाय व नोकरीसाठी विद्यार्थ्यांना हे शैक्षणिक धोरण उपयुक्त ठरणार असल्याचे सांगितले.

यावेळी कार्यक्रमास हजर असलेल्या विद्यार्थी व पालकांना उपस्थिती प्रमाणपत्रे देण्यात आले.

प्रास्ताविक प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, सूत्रसंचालन प्रा. मच्छिंद्र मुळूक, परिचय डॉ. गणेश धुमाळ यांनी तर आभार डॉ. दिलीप मुळूक यांनी मानले.

**डॉ. संजय शिंदे**
**प्रसिद्धी विभाग प्रमुख**